## कांदा उत्पादकांनी घ्यावयाची काळजी

- शेतकऱ्यांनी मार्केट मधील किंमतींचा (आकृती प्रमाणे) आढावा घेऊन लागवड करावी व कांदा बाजारामध्ये आणावा.
- फेब्रुवारी ते जून दरम्यान मोठ्या प्रमाणात रब्बी व लेट खरीप कांद्याची बाजारात आवक होत असते.
- त्यामुळे रब्बी कांद्याचे उत्पादन साठवणुकीच्या हेतूनेच घ्यावे.
- रब्बी कांद्याची साठवणूक क्षमता चांगली असते. हा कांदा व्यवस्थितरित्या साठवून जर नोव्हेंबर–डिसेंबर मध्ये मार्केटला आणला तर चांगला दर मिळू शकतो.
- खरीप कांद्याची लागवड पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या माळाच्या/मुरमाड जमिनीत उंच वरंबा पद्धतीने करावी, जेणेकरून जास्त पाण्यामुळे पिकाचे नुकसान होणार नाही.
- एखाद्या वर्षी जर कांद्याच्या किंमती खूप जास्त राहिल्या असतील, तर पुढील हंगामात कांदा लागवड कमीत कमी करावी. याउलट ज्या वर्षी किंमती खूप कमी असतील त्याच्या पुढच्या हंगामात कांदा लागवड जास्त करावी.



Technical folder no. : 10


● संशोधन आणि संग्रहण ●

अंकुश एल. कांबळे व नरेंद्र पी. सिंह

अधिक माहितीसाठी संपर्क

● निदेशक ●

भाकृअनुप-राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान

माळेगाव, बारामती 413 115, पुणे, महाराष्ट्र

02112-254057 02112-254056

www.niam.res.in


# कांदा पिकातील बाजार व्यवस्थापन



भाकृअनुप ICAR

हर कदम, हर डगर किसानों का हमसफर भारतीय कृषि अनुसंधान परिषद

Agrisearch with a human touch

राअस्ट्रैप्रसं NIASM

## भाकृअनुप राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान

## प्रस्तावना


- भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा कांदा उत्पादक देश आहे.
- भारतात प्रामुख्याने महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य-प्रदेश, बिहार, राजस्थान आणि गुजरात या राज्यांमध्ये कांदा पिकतो.
- महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादनात देशात अग्रेसर आहे.
- राज्यात एकूण ४,४१,९०० हेक्टर क्षेत्रामध्ये ५३,६१,९६० मेट्रिक टन कांदा पिकवला जातो.

## कांदा उत्पादनातील प्रमुख समस्या : अस्थिर बाजारभाव

- अस्थिर बाजारभाव ही कांदा उत्पादनातील प्रमुख समस्या आहे.
- कांदा हे प्रामुख्याने रब्बी पीक असून त्याचा मुख्य भाग फेब्रुवारी ते मे या कालावधीत बाजारात पोहचतो.
- परंतु कांद्याचा आहारामध्ये वर्षभर वापर केला जातो.
- कांद्याला वर्षभर असलेली अलवचिक मागणी व हंगामी उत्पादन यामुळे कांद्याचे दर वर्षभर स्थिर राहत नाहीत.


**बाजारामधील सरासरी पेक्षा कमी-जास्त किंमती (टक्केवारी मध्ये)**

⇨ पुणे मार्केट




- पुणे मार्केट मध्ये फेब्रुवारी ते जुलै दरम्यान सरासरी पेक्षा कमी किंमती असतात, तसेच सरासरी पेक्षा जास्त किंमती ऑगस्ट ते जानेवारी दरम्यान राहतात.
- पुणे मार्केटला एप्रिल मध्ये सरासरी पेक्षा ४१% किंमती कमी असतात त्याचबरोबर नोव्हेंबर मध्ये सरासरी पेक्षा ५३% किंमती जास्त असतात.

⇨ सोलापूर मार्केट




- सोलापूर मार्केट मध्ये मार्च ते जून दरम्यान सरासरी पेक्षा कमी किंमती असतात, तसेच सरासरी पेक्षा जास्त किंमती जुलै ते फेब्रुवारी महिन्यामध्ये राहतात.
- एप्रिल-मे मध्ये सरासरी पेक्षा ४२% किंमती कमी असतात, त्याचबरोबर डिसेंबर मध्ये सरासरी पेक्षा ३१% किंमती जास्त असतात.





